# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७८ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०७ भाद्र. शके १९४८, शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## पेपर फुटीचा कहर: गैरव्यवहारांनी गाठला विक्रमी उच्चांक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

पेपर फुटीच्या गैरव्यवहारांनी देशात आणि राज्यात गंभीर रूप धारण केले असून कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ मांडला जात आहे. स्पर्धा परीक्षांपासून ते थेट शिक्षक पात्रता परीक्षांपर्यंत आणि वैद्यकीय क्षेत्रातील नीट प्रवेश परीक्षांपर्यंत सर्वच क्षेत्रांत पेपर फुटीच्या सिंडिकेटने विक्रमी उच्चांक गाठला आहे. या

पेपरफुटीच्या घटनांनी खरंच देशात आणि महाराष्ट्रात नवा उच्चांक गाठला असून, गेल्या काही वर्षांत कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य यामुळे अंधारात सापडले आहे. स्पर्धा परीक्षांपासून ते थेट पात्रता परीक्षांपर्यंत लागलेल्या या ग्रहाणामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.

गेट युजी पेपर फुटीची घटना ताजी असतानाच परत एकदा महाराष्ट्रात एम पी एस सी ड्रग इन्स्पेक्टर परीक्षा: ऑगस्ट २०२६ मध्ये मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने एम पी एस सी च्या औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर लीक झाल्याचे उघड केले. या प्रकरणात एम पी एस सी च्या ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ६ जणांना अटक करण्यात आली असून, प्रेमप्रकरणाच्या वादातून आणि ब्रेकअपनंतर एकाने केलेल्या ई–मेल तक्रारीमुळे हे मोठे रॅकेट समोर आले. ही परीक्षा आता रद्द करण्यात आली आहे.

वाढत्या घटना आणि प्रकार:

महाराष्ट्रात जून २०२६ मध्ये होणारी महाटीईटी परीक्षा पेपर फ ुटल्यामुळे ऐनवेळी पुढे ढकलावी लागली. आग्रा येथील छपाईखान्यातून बूट आणि चपलांच्या तळव्यात प्रश्नपत्रिका लपवून त्या दीड कोटी रुपयांपर्यंत विकल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. या प्रकरणी बिहारमधील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे.नीट युजी २०२६ घोटाळा राष्ट्रीय पातळीवर वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली परीक्षा प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांच्या गैरव्यवहारामुळे मे २०२६ मध्ये रद्द करावी लागली होती यात देशातील २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना फटका बसला होता .महाराष्ट्रातील लातूर आणि पुणे ही कोचिंग हब या तपासाच्या केंद्रस्थानी राहिली आहे

गेल्या ५ ते ६ वर्षांत देशभरात ६० पेक्षा जास्त मोठ्या सरकारी भरती आणि बोर्डाच्या परीक्षांचे पेपर लीक झाले आहेत. या पेपरफ ुटीच्या साखळीमुळे १ कोटीपेक्षा जास्त प्रामाणिक उमेदवारांचे कष्ट वाया गेले असून त्यांना मानसिक आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला आहे.सरकारी पावले आणि नवे कायदेवाढत्या उच्चांकाची दखल घेत प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

चंद्रपूर बनावट गुणपत्रिका प्रकरण: चंद्रपुरात विविध विद्यापीठांच्या बनावट गुणपत्रिका आणि पदवीचे रॅकेट उघडकीस आले असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. छत्तीसगडमधील तंत्रज्ञानाचा वापर: छत्तीसगडमध्ये चक्क एन्डोस्कोपिक कॅमेऱ्याचा वापर करून प्रश्नपत्रिका फोडल्याचा प्रकार समोर आला असून यामध्ये प्राध्यापकासह सहा जणांना अटक झाली आहे.

सरकारी पावले आणि नवे कायदे:

२३ विशेष जलदगती न्यायालये महाराष्ट्रात पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहारांच्या प्रकरणांसाठी २३ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत, जेणेकरून ३ महिन्यांत निकाल लावला जाईल.

१० वर्षांचा तुरुंगवास आणि ५ कोटींचा दंड: केंद्र व राज्य सरकारच्या नवीन कायद्यांनुसार परीक्षा माफिया आणि गैरव्यवहार करणाऱ्यांवर ५ ते १० वर्षांची जेल आणि ५ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

कोचिंग क्लासेसवर नियंत्रण: महाराष्ट्राने कोचिंग क्लासेसच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी व परीक्षांमधील त्यांची संशयास्पद भूमिका रोखण्यासाठी महाराष्ट्र खाजगी शिकवणी वर्ग नियमन कायदा २०२६ चा मसुदा तयार केला आहे.

सिस्टीममधील त्रुटी आणि आव्हाने:

कडक कायदे असूनही अंमलबजावणीचा अभाव: २०२४ मध्ये कायदा आणूनही २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणावर पेपर लीक झाले, ज्यामुळे केवळ कठोर कायदे पुरेसे नसून त्यांची तात्काळ अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.आतल्या लोकांचा सहभाग: बहुतांश प्रकरणांमध्ये परीक्षा घेणाऱ्या संस्थांचे अधिकारी, छपाई करणारे प्रेस कर्मचारी किंवा आयटी विभागातील लोकच भ्रष्टाचाराला बळी पडत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

## उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे पंचवीस हजार राख्यांचे वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – बहिण – भावातील पवित्र नात्याच्या बांधिलकीची जाण ठेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांनी पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील पंचवीस हजार कुटुंबियांना उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून राख्यांचे घरपोच वाटप केले. याव्यतिरिक्त देशाच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेले जवान, सफाई कामगार, पोलिस कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, प्रशासकीय सेवेतील अधिकारी तसेच समाजाच्या विविध घटकातील पुरुषांना बंधुत्वाच्या नात्याने त्यांच्या मनगटावर राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

सध्या देशभर रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त '' पंच परिवर्तन '' व्दारे जे विविध सामाजिक समरसतेचे उपक्रम राबवले जात आहेत त्यापासून प्रेरणा घेत समाजातील विविध घटकांना जोडणारा हा रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम हाती घेतल्याचे डॉ. कुंदाताई भिसे यांनी सांगितले.



## कौशल्य व जिद्दीचे प्रतिक – मेजर ध्यानचंद

**ज्योतिर्मय साहित्य**

(२९ ऑगस्ट क्रीडा दिन)

कौशल्य आणि जिद्द याच्या जोरावर कोणताही खेळाडू आपल्या खेळात यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी प्रचंड परिश्रम घ्यावे लागतात. हॉकीतून त्यांनी भारताला तीन वेळा सुवर्णपदक जिंकून दिले. त्यामुळे भारताचे नाव जगभर झळकले .त्यांच्या खेळातून आजच्या तरुणांनी प्रेरणा घ्यावी, व आपण सुद्धा जिद्दीच्या जोरावर खेळ खेळावेत. मेजर ध्यानचंद यांनी हॉकी खेळ खेळत सुभेदार,लेफ्टनंट, कॅप्टन हे पदे भूषविली. त्यांचीही क्षमता पाहून शासनाने मेजर पदावर नियुक्ती केली.त्यामुळे त्यांना मेजर ध्यानचंद असे म्हटले जाते. त्यांच्याविषयी आज आपण माहिती करून घेत आहोत.

मनुष्याला जीवनातील व्यथा, चिंता,राग विसरायला लावणारा व मनाला विरंगुळा देणारा क्षण म्हणजे खेळ होय.शारीरिक हालचालीने व व्यायाम करून शरीर काटक बनवता येते. मनोरंजनासाठी आणि शारीरिक कसरतीसाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे खेळ होय. प्राचीन काळातही खेळ खेळले जात होते.उदा.घोड्याच्या व रथाच्या शर्ती,कुस्ती,बुद्धिबळ, द्यूत असे अनेक खेळ असत,खेळामधून खिलाडूपणा,नेतृत्व,चिकाटी, साहस,धाडस, मनोधैर्य इत्यादी गुणांचा विकास होतो.सांघिक खेळामुळे आपल्या मनामध्ये इतरां बद्दल सहकार्य व संघ भावना वाढवण्यास मदत होते. खेळाचे बैठे व मैदानी खेळ असे अनेक प्रकार आहेत. धावणे, शारीरिक कौशल्यावर आधारित, पाण्यातील खेळ, शारीरिक कसरतीचे खेळ, साहसी खेळ,रोमांचकारी खेळ इत्यादी खेळ खेळले जातात.

मेजर ध्यानचंद यांना हॉकीचे जादूगार म्हणतात. २९ ऑगस्ट हा मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून भारतात सर्वत्र साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९०५ रोजी त्यांचा जन्म उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे झाला. त्यांच्या



वडिलांचे नाव सोमेश्वर सिंग होते. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी ब्रिटिश इंडियन आर्मी मध्ये शिपाई म्हणून रुजू झाले. तेव्हापासूनच त्यांना हॉकीचा खेळ आवडत असे. सन.१९२८ मध्ये अमर स्टॅम,सन१९३२ मध्ये लॉस एंजलस आणि १९३६ मध्ये जर्मनीची राजधानी बर्लिन या ठिकाणी त्यांना अनुक्रमे हॉकीच्या खेळात तीन सुवर्णपदक मिळाले. त्यामुळे जगात भारताचे नाव सर्वत्र झळकले. त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते.ज्या ज्या वेळी मेजर ध्यानचंद भारताला सुवर्णपदक जिंकून देत होते. त्यावेळेस जर्मनीचा हुकुमशहा हिटलर यांनी मेजर ध्यानचंद यांनी जर्मनीकडून खेळावे. असे म्हटले आणि उच्च पदस्थ अधिकारी म्हणून नेमले जाईल.असे आमिष दाखविले. परंतु राष्ट्रभक्त मेजर ध्यानचंद यांनी हसून हिटलरला नकार दर्शविला. यामुळे मेजर ध्यानचंद यांची देशावरील प्रेम व निष्ठा सर्व भारतीयांना दिसून आली त्यामुळेच भारत सरकारने त्यांना १९५६ मध्ये *पद्मभूषण* हा तीन क्रमांकाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथोचित सत्कार केला. त्यांच्या नावाने आज भारताचा क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मेजर ध्यानचंद खेलरत्न खेळाडूंना दिला जातो.सलग ३४ वर्ष त्यांनी सेवा केली. नंतर ते सेवानिवृत्त झाले.

हॉकी मध्ये भारताचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. त्यामुळे जगात भारताचा धबधबा निर्माण झाला आहे. ऑलम्पिक मध्ये सुवर्णपदक मिळणे हे फार कष्टाचे कार्य आहे ऑलम्पिक मधून व्यक्तींचे सर्वस्व पणाला लावावे लागते.तेव्हा अशी पदके मिळतात. खेळाच्या प्रशिक्षणासाठी भारतात अनेक प्रसिद्ध संस्था सध्या निर्माण झालेल्या आहेत. शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती. खासबाग व मोतीबाग तालीम कोल्हापूर,पतियाळा क्रीडा विद्यापीठ ,पतियाळा.पैलवान जुम्मा दादा आणि माणिकराव व्यायाम शाळा, वडोदरा.

असे काही नाव सांगता येतात.

काही खेळामधून चित्रपट निर्माण झाले. दंगल, चेक दे इंडिया या चित्रपटातून खेळाचे महत्व दर्शविण्यात आले. ऑलम्पिक मध्ये मुष्टीयुद्धा मेरी कोम,धावपटू मिल्खा सिंग,फोगट भगिनी,

खाशाबा जाधव, मारुती माने ही प्रसिद्ध कुस्तीगीर आहेत.

सचिन तेंडुलकर यांना भारत सरकारने क्रिकेट या खेळाबद्दल भारतरत्न हा किताब दिला आहे. त्यामुळे खेळाचे महत्व अनन्य साधारण आहे

कॅप्टन महेंद्रसिंग धोनी यांच्या जीवनावर ही चित्रपट निघाले आहेत.

भारतात क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, थाळीफेक, गोळा फेक, लांब उडी, उंच उडी, वॉटर पोलो, नौकानयन, मल्लखांब ,दोरीवरचा मल्लखांब, आईस हॉकी, स्केटिंग, स्कीईग, ग्लायडिंग,पॅराग्लायडिंग हे खेळ खेळले जातात.भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी आहे. संपूर्ण शाळां मधून हॉकी हा खेळ खेळला जावा. त्यासाठी मैदाने उपलब्ध करून द्यावेत. हॉकी या खेळाचे बाळकडू बालपणापासून मिळावेत.

अशा या महान खेळाडूचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले.

हॉकी संघाचे ते अनेक वर्ष संघनायक होते.३ डिसेंबर १९७९ रोजी त्यांचे निधन झाले.

सध्या अनेक खेळाची स्थिती चांगली राहिली नाही.उत्तेजित पेय पिऊन खेळाडू दोषी आढळत आहेत. महिला खेळाडूवर अन्याय, अत्याचार होत आहेत.त्यामुळे एकमेकांवरील विश्वास कमी होताना दिसून येत आहे.

खऱ्या खेळाडू कडे लक्ष न देता वशिला लावून खेळाडू तयार केले जात आहेत. हातात मोबाईल आल्यामुळे जवळ जवळ अनेक मुलांचे शारीरिक खेळ खेळणे जवळजवळ कमी झाले आहे.




असे जर काही वर्षे चालू राहिले तर खेळाच्या स्पर्धा कमी होतील.

बऱ्याच शाळांना खेळाचे मैदान शिल्लक राहिले नाही. त्यामुळे मुलांचे शरीर काटक राहिले नाही. अनेक रोग होत आहेत. स्थूलपणा वाढत आहे. शासनाने शारीरिक शिक्षण विषय शिक्षकाची लवकरात लवकर भरती करावी. खेळामधून मुलांना जास्तीत जास्त गुण कसे देता येतील याचाही आराखडा तयार करावा. जेणेकरून आजचा तरुण खेळाकडे आकर्षित होईल.

असे मला वाटते. मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता.मुखेड यांच्या वतीने विनम्र अभिवादन..

****



## बाई तुझ्या अवकाशात पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – सृजनसंवाद प्रकाशन प्रकाशित, डॉ. कीर्ती जाधव लिखित बाई तुझ्या अवकाशात कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी डॉ. केशव सखाराम देशमुख यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी व काव्यअभ्यासक, समीक्षक डॉ. सुजाता शेणई यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथे पार पडले. एखाद्या पुस्तकावर किती अभ्यासपूर्ण प्रगटावे याचा वस्तूपाठ तीनही मान्यवरांनी या कवितासंग्रहाच्या प्रकाशनानिमित्ताने घातला. कार्यक्रमाचे ओघावते सूत्रसंचालन कवयित्री चिन्मयी चिटणीस यांनी केले.

घरपोच पुस्तकासाठी संपर्क : ९८२०२७२६४६

## बा आणि शब्द...

**ज्योतिर्मय साहित्य**

सांजवेळ झाली होती. डोंगराआड सूर्य लपायच्या तयारीत होता. सगळीकडे लाली फाकली होती. अंधाराने आपले हात पाय पसरायला सुरुवात केली. डोंगराच्या कुशीत वसलेले तीस ते चाळीस उंबऱ्यांचं 'राजापूर' गाव; गावातली सगळी माणसं कष्टकरी ; डोंगरदऱ्याचं गाव, त्यामुळे शेतजमीन कमी. दुसऱ्यांच्या शेतात राबून, रानावनातल्या वस्तू गोळा करून जगणारा गाव.

रात्र झाली सगळ्या घरात घर कसली झोपड्याच त्या.. सगळ्या झोपड्यांत चुली पेटल्या. चिमणीचा अंधुक प्रकाश पसरायला लागला .


मिनीने सुद्धा आपल्या झोपडीतला दिवा लावला. अंगण झाडले . मिनाक्षी ९–१० वर्षाची चुणचुणीत मुलगी. तिची आई आणि बा म्हणजेच रखमा आणि महादू शेजारच्या गावात रोजंदारीवर कामाला जात असत. आज सुध्दा ते कामाला गेले होते. मिनी ने चूल पेटवली पाणी तापायला ठेवलं. भाकरीचे पीठ काढलं. सगळी काम ती भरभर करत होती. काम करता करता तिचं लक्ष सतत वाटेकडे लागल होत. तिने कित्येकदा बाहेर येऊन रस्ता न्याहळला. ती तिच्या आईची व बाची वाट पाहत होती. रोजच वाट पाहायची. पण आज विशेष कारण होतं...

तिच्या बा ने तिला एक शब्द दिला होता. हो शब्दच! आज बा रानातून येताना तिच्यासाठी वही आणि पेन आणणार होता. मिनी गावातल्या



शाळेत जात होती सगळ्या मुलांकडे नवीन वह्या होत्या. छान छान पेन होते. पण मिनीकडे मात्र यातलं काहीच नव्हतं. ती रोज महादू मागं टुमनं लावत होती वही पेन आणण्यासाठी आणि महादू तिला कसंबसं समजवत होता. रखमाचं मात्र म्हणणं होतं की तिला कामाला न्यावं ; तेवढंच घरात चार पैसे येतील. पण महादूचा मात्र तिचं शिक्षण बंद करायला विरोध होता. पोटाला चिमटा काढून तो कसाबसा संसाराचा गाडा हाकत होता. रोजच्या खाण्याची भ्रांत असलेल्या महादूला मिनीची मागणी मान्य करणं अवघड होतं, पण आज मात्र त्यानं तिला वही पेन आणणारच असं आश्वासन दिलं होतं.

आज मिनी खूप खुश होती. कधी एकदा बा येतो आणि तिची वही पेन तिला मिळतोय असं तिला झालं होतं. सांज जाऊन रात्र झाली. अंधाराने आपला विळखा अजून घट्ट केला. मिनी कित्येक वेळा बाहेर येऊन गेली. आज रखमाला व महादूला नेहमीपेक्षा जास्त वेळ लागला होता. शेवटी ती अंगणात येऊन बसली. तिने चुलीवर कालवण टाकलं आणि भाकरी थापायला परात घेतली. तेवढ्यात लांबून बैलगाडीचा आवाज आला. मिनी रस्त्याकडे धावली आणि समोरचं दृश्य पाहून जागीच थबकली. बैलगाडी घेऊन शेजारचा रामूकाका येत होता. रखमा म्हणजेच तिची आईची रडून रडून वाईट अवस्था झालेली तीनं पाहिली आणि तिचा बा तिला कुठे दिसत नव्हता. तिने रखमाला हंबरडा फोडून विचारल,'' आये बा कुठय?'' तिच्या हंबरड्याने रखमा भानावर आली. मिनीला उराशी धरून तिने घडलेला प्रकार सांगितला .




महादूला काम करताना विजेचा धक्का बसून लकवा मारला. एक बाजू पूर्ण निकामी झाली होती. महादू थोडक्यात वाचला होता. त्याला तालुक्याच्या गावी दवाखान्यात दाखल केले होते. आपल्या बाची अवस्था ऐकून मिनी बावरून गेली आणि धाय मोकलून रडत जागेवरच कोसळली.

दुसऱ्या दिवशी सकाळी रखमा उठली. घरातली काम भराभर उरकली. घर काम उरकून महादूकडे दवाखान्यात सुद्धा जायचे होते. त्यामुळे तिचे हात भरभर चालत होते. तिने मिनीला आवरायला सांगितले. आईने सांगितल्याप्रमाणे मिनी सगळी काम उरकत होती. काम करत असताना तिला महादूची पिशवी दिसली. तिने लगबगीने पिशवी उघडली त्यात तिला वही आणि पेन दिसला. ती त्या वही आणि पेन कडे पाहत राहिली. तिला तिचा बा आणि शाळा दोन्ही दिसत होते. तेवढ्यात रखमाने जोरात तिच्या हातातीन वही हिसकावून घेतली आणि तिच्या हातात खुरप दिलं. ''चल कामावर चार पैकं मिळतील ह्यानं '' असं म्हणून तिला बाहेर काढलं. मिनी त्या खुरप्याकडे निःशब्द होऊन तिथेच पाहत उभी राहिली. कितीतरी वेळ .तेवढ्यात तिच्या बा ला तिने दिलेला शब्द तिला आठवला .''बा, काही झालं तरी मी शाळा सोडणार नाही'' तिने परत जाऊन महादूच्या पिशवीतला वही व पेन घेतला. आता तिच्या हातात खुरपं होतं आणि वहीसुद्धा आणि डोळ्यात एक वेगळीच चमक!




## जात्यावरच्या ओव्या......

आज दमले दमले
देते टाकून अंग
उभा जन्म बांधला
संसारात देहासंग ||८१८||

आज दमले दमले
सांगते शेजीला
नको पेटवू चुल
धाड लेकरू भाजीला ||८१९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६७




**ज्योतिर्मय साहित्य**

अशा या धीर गंभीर आणि पूर्णप्रतापी श्रीरामांचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या सेवकाच्या संकटात धावून जातात, त्याचे रक्षण करतात. ते भक्तवत्सल आहेत. ज्या ज्या भक्तांनी संकटकाळी त्यांचा धावा केला, त्यांच्या साहाय्याला ते तात्काळ धावून गेले आहेत. पण परमेश्वरावर दृढ श्रद्धा हवी. त्यासाठी परमेश्वराची अनन्यभावाने भक्ती करावी लागते. अनन्यभावाने म्हणजे हे परमेश्वरा, मला तुझ्याशिवाय कोणी त्राता नाही. तूच माझे सर्वस्व आहेस. अशा प्रकारची वृत्ती हवी. श्रीरामांचे किंवा श्रीकृष्णाचे भक्त हे अशा प्रकारचे होते. हनुमंताला तर एका रामाशिवाय दुसरे काहीच नको होते. अशा या रामाचे ( भगवंताचे ) पहाटे चिंतन करायला समर्थ आपल्याला सांगत आहेत.




रात्रीची शांत निद्रा आटोपली की पहाटेच्या वेळी आपले मन एखाद्या नदीच्या डोहासारखे शांत असते. पाणी जर स्वच्छ आणि शांत असेल तर त्यात आपले प्रतिबिंब दिसते. त्याचा तळ दिसतो. पहाटेच्या वेळी अशा शांत आणि इतर विचारांची गर्दी नसलेल्या मनात रामाचे चिंतन करावे. त्याचेच प्रतिबिंब आपल्या मनात पडावे. सकाळ जर अशी पवित्र आणि सुंदर झाली तर दिवसही चांगला जाईल. आपण जेव्हा त्याचे चिंतन करू तेव्हा त्याचे रूप आणि गुण आपोआपच आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात. आपली सकाळ मोबाईल, टीव्ही किंवा वर्तमानपत्रांच्या बातम्याने बऱ्याच वेळा होते. त्यातील अपघात, खून, दरोडे, अत्याचार, राजकीय नेत्यांचे एकमेकांवर आरोप इ. नकारात्मक बातम्यांनी आपल्या दिवसाची सुरुवात न करता श्रीरामाच्या चिंतनानेच करावी.

स्वसंवाद : १) माझ्या दिवसाची सुरुवात कोणत्या विचारांनी होते ? चिंतेने की चिंतनाने?

२) पहाटेच्या शांत वेळेत मी स्वतःसाठी आणि भगवंतासाठी काही क्षण राखून ठेवतो का?

३) संकटसमयी माझी भिस्त भगवंतावर असते का ? ४) मी दिवसभरात जास्त कोणत्या गोष्टी मनात साठवतो ? नकारात्मक बातम्या की सकारात्मक चिंतन? ५) रामाचे धैर्य, गांभीर्य आणि करुणा हे गुण माझ्यातही यावेत असे मला वाटते का? **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||


@संजय काव्या पुणे 7743918559



**सहज उपलब्ध होणाऱ्या गोष्टी नेहमी दुर्लक्षिल्या जातात, आपण आपली किंमत कमी करू नये. प्रत्येक गोष्टीची किंमत पैशाने मोजता येत नसते काही गोष्टी मिळावीण्यासाठी स्वतःला सिद्ध करावे लागते.**

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## मायेच्या तावडीतून सुटण्यास नाम हेच साधन



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे पुष्कळ लोकांना मनातून फार वाटते, पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते. मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे ? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे; 'तिला सोडून तू ये' असे त्याला म्हणणे म्हणजे 'तू येऊ नकोस' असे म्हणण्यासारखेच आहे; कारण एखाद्या इसमाला 'तू ये, पण तुझी सावली आणू नको' म्हटले तर कसे शक्य आहे ? म्हणून माया ही राहणारच. आपण तिच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत पोहोचायचे कसे हाच प्रश्न आहे; आणि या प्रश्नाचे उत्तर एकच : भगवंताचे नाम घेणे. नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तीशिवाय सावलीला अस्तित्व नाही, तसे मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही. तसेच तिला स्वतंत्र शक्तीही नाही, कारण व्यक्तीच्या हालचालीप्रमाणेच तिची हालचाल होते. व्यक्ती न दिसली तरी तिची सावली जशी दिसते, त्याप्रमाणे मायेचे अस्तित्व मात्र जाणवते. मायेची सत्ता भगवंतावर नाही. एखादा इसम पूर्व दिशेला चालला आहे, तर त्याची सावली त्याच्यामागून त्याच दिशेने जाईल; त्या सावलीच्या मनात जर दिशा बदलून पश्चिमेकडे जाण्याचे आले तर तिला ते शक्य नाही. तो मनुष्यच जर पश्चिमेकडे जाऊ लागला तरच तिला त्या दिशेकडे जाणे शक्य आहे. याचाच अर्थ, माया भगवंताच्या अधीन आहे. सर्व विश्व हे मायारूप आहे; म्हणजे ते परमेश्वराची छाया आहे; याचा अर्थ, या विश्वाला आधार परमेश्वरच आहे.

आता या मायेच्या तावडीतून सुटून परमेश्वराकडे कसे जायचे ? समजा, एखाद्या इसमाला एका मोठ्या व्यक्तीला भेटायचे आहे. पण त्याच्याकडे सरळ जाणे शक्य नाही, कारण त्याच्या घराच्या दारावर रखवालदार, कुत्रे वगैरे आहेत. त्यांच्या तावडीतून सुटून गेले तरच मालकाची भेट होणार. पण समजा, 'मला अमक्या दिवशी येऊन भेटावे' अशा मजकूराचे त्या मालकाच्या सहीचे पत्र जर त्याला आले असेल, तर ते पत्र त्या रखवालदाराला दाखविताच तो त्याला बिनतक्रार आत सोडील आणि मालकाची भेट होईल. तसे भगवंताचे नाम, म्हणजे भगवंताच्या सहीचे पत्र, जर आपण घेऊन गेलो तर मायारूपी रखवालदार ती सही पाहून आपल्याला आत सोडील आणि भगवंताची भेट होईल. म्हणून माया तरून जायला भगवंताचे नामस्मरण हाच रामबाण उपाय आहे. नामस्मरणात खूप तल्लीन व्हावे, देहाचा विसर पडावा. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. भगवंत जर कृपण असेल तर तो नामभक्ती देण्यात आहे. म्हणून त्याला आळवावे आणि 'तुझ्या नामाचे प्रेम दे' हेच मागावे. बाकी सगळे देईल, पण हे नामप्रेम तो फार क्वचित् देतो. म्हणून आपण तेच मागावे. रामाचे अनुसंधान नित्य ठेवावे आणि आनंदात राहावे.

विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय; नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय.

***

## || अध्यात्म ||


मधुकर बोरीकर, पुणे

### श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



पुढे......
नारदांनी इंद्राला असे सांगितले की, या कयाधूच्या पोटी जन्म घेणारा बालक हा थोर भगवत भक्त असेल. त्यामुळे तू कयाधूला घेऊन जाऊ नकोस. तिला इथेच सोड. इंद्राने तसेच केले. सध्याच्या नीरा नरसिंगपूर भागात त्याकाळी नारद महर्षींचा आश्रम होता. त्यांच्या सत्संगतीत कयाधूच्या गर्भावर भगवत भक्तीचे दिव्य संस्कार झाले. योग्य वेळी तिच्या पोटी भक्त प्रल्हादाने जन्म घेतला. या प्रल्हादाला बालपणीच नारद मूनीचा अनुग्रह प्राप्त झाला. त्यांनी त्याला *ओम नमो नारायणाय* हा दिव्य मंत्र जप करण्यासाठी दिला. बालक प्रल्हाद रोज ब्रह्म मुहूर्तावर नारद मुनी सोबत, निरा आणि भीमा नदीच्या संगमावर स्नानासाठी जात असे. तो स्नान झाल्यावर तेथील वाळूने भगवंताची एक मूर्ती तयार करून, तिची मनोभावे पूजा करी, आणि त्याचेच समोर बसून तो ओम नमो नारायणाय हा जप करीत असे. (क्रमश:)

## संत कबीर के दोहे




मूळ हिंदी चौपाई व मराठी अर्थ

**चौपाई २५**
*साधु आवत देखि कर, हंसी हमारी देह।*
*माथा का ग्रह उतरा, नैनन बढ़ा स्नेह।। २५।।*

**मराठी अर्थ:**
*संत येताना पाहून मनुष्याचे मन आनंदाने प्रसन्न होते. त्यांच्या दर्शनाने संकटे दूर होतात आणि संतांविषयीचे प्रेम व आदर वाढतो.*



संकलन :
उदय भास्कर खांडेकर, मो. 9421908190

## थंड हवामान आणि तब्येती मध्ये बदल



**ज्योतिर्मय साहित्य**

हवामानामुळे आपल्या तब्येतीत अनेक बदल होऊ शकतात. मुख्य बदल असे:

- सर्दी, खोकला आणि घसा दुखणे वाढू शकते.
- ताप किंवा व्हायरल संसर्ग होण्याची शक्यता वाढते.
- दम्याचा किंवा ॲलर्जीचा त्रास वाढू शकतो.
- सांधे व स्नायू दुखणे किंवा कडकपणा जाणवू शकतो.
- रक्तदाबात चढ-उतार होऊ शकतात, विशेषतः ज्यांना आधीपासून उच्च रक्तदाब आहे.
- तहान कमी लागल्याने शरीरात पाण्याची कमतरता होऊ शकते.
- काहींना जास्त झोप येते किंवा आळस जाणवतो.
- गरम आणि जास्त कॅलरीयुक्त पदार्थ खाण्याची इच्छा वाढते.
- त्वचा कोरडी पडणे, ओठ फुटणे यासारख्या समस्या होऊ शकतात.
- शरीराचे तापमान कमी होण्याची शक्यता वाढते.
- रोगप्रतिकारक शक्ती काही प्रमाणात कमी झाल्यास संसर्ग लवकर होऊ शकतो.
- सायनसचा त्रास वाढू शकतो.
- डोकेदुखी किंवा मायग्रेनचा त्रास काही लोकांमध्ये वाढतो.
- जुन्या दुखापती किंवा सांधेदुखी पुन्हा जाणवू शकते.
- पचनशक्ती मंदावल्यामुळे अपचन, गॅस किंवा पोट फुगणे होऊ शकते.
- डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढतो.
- दूषित अन्न-पाण्यामुळे जुलाब किंवा अन्नातून होणारे संसर्ग होऊ शकतात.
- सतत ओले पाय राहिल्यास बुरशीजन्य संसर्ग (फंगल इन्फेक्शन) होऊ शकतो.
- नाक बंद होणे, शिंक येणे आणि ॲलर्जी वाढू शकते.
- थकवा, अशक्तपणा किंवा कामात उत्साह कमी वाटू शकतो.
- काही लोकांमध्ये मूडमध्ये बदल किंवा चिडचिड वाढू शकते.
- हवेत आर्द्रता वाढल्याने घाम नीट वाफ होत नाही, त्यामुळे चिकटपणा जाणवतो.
- श्वसनाचे आजार (दमा, ब्रॉंकायटिस) वाढण्याची शक्यता असते.
- हृदयविकार असलेल्या व्यक्तींनी थंड हवामानात जास्त काळजी घ्यावी.
- काहींना एकाग्रता कमी होणे किंवा सुस्ती जाणवू शकते.
- थंड पदार्थ खाल्ल्यास दातांची संवेदनशीलता वाढू शकते.
- जखमा भरून येण्यास थोडा जास्त वेळ लागू शकतो.
- डोळ्यांत खाज, पाणी येणे किंवा ॲलर्जी होऊ शकते.
- ओले बूट किंवा मोजे जास्त वेळ घातल्यास पायांना दुर्गंधी व बुरशीचा संसर्ग होऊ शकतो.
- बाहेरचे उघड्यावरचे अन्न खाल्ल्यास पोटाचे विकार होण्याचा धोका वाढतो.

तब्येत चांगली ठेवण्यासाठी:

- गरम व ताजे अन्न खा.
- कोमट पाणी प्या आणि पुरेसे पाणी पिणे सुरू ठेवा.
- पावसात किंवा थंडीत भिजल्यास लगेच कोरडे कपडे घाला. **(क्रमशः)**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

**षटकोळी माझी**

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**सण नारळी पूनवेचा**

आला पहा सख्यांनो
आज सुंदर दिस
सण नारळी पूनवेचा
नेत्रदिपाने करते औक्षण
मनी हित चिंतता
वर्षाव होई आनंदाचा

सण नारळी पूनवेचा
आज आला पहा
भाऊ-बहिणीचा छान
रेशमी धागा हाती
आनंदाने बांधता खरी
एकमेकांना देती मान

# प्रा. यास्मिन शेख आणि चित्रकार श्रीधर अंभोरे यांना श्रद्धांजली

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ, लेखिका आणि मराठी भाषा-अभ्यासक प्रा. यास्मिन शेख तसेच प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या निधनाने भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण करण्यासाठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, जिल्हा शाखा-छत्रपती संभाजीनगर, साहित्य भारती-छत्रपती संभाजीनगर आणि त्रैमासिक तिफन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही श्रद्धांजली सभा शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, ग्रामविकास भवन, राष्ट्रमाता जिजाऊ चौक, एन-२, ठाकरेनगर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

प्रा. यास्मिन शेख यांनी मराठी व्याकरण, भाषा-अभ्यास आणि मराठी भाषा विकासाच्या क्षेत्रात आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. मराठी भाषेच्या शुद्धतेसाठी, संवर्धनासाठी आणि समृद्धीसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने मराठी भाषा-अभ्यासाच्या क्षेत्रात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांनी आपल्या कुंचल्यातून कलाविश्व समृद्ध केले. त्यांची सर्जनशील दृष्टी, कलासाधना आणि चित्रकलेतील योगदान रसिकांच्या सदैव स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने चित्रकला क्षेत्राचीही मोठी हानी झाली आहे.

या श्रद्धांजली सभेचे अध्यक्षस्थान मा. डॉ. वासुदेव मुलाटे, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक, छत्रपती संभाजीनगर हे भूषविणार आहेत. प्रमुख उपस्थितांमध्ये मा. डॉ. सर्जेराव जिगे, मा. उमेश काळे, मा. डॉ. नागेश अंकुश आणि मा. डॉ. हबीब भंडारे यांचा समावेश आहे. प्रास्ताविक सुनील डोके, सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ आणि आभार डॉ. संजय शिंदे मानणार आहेत.

आयोजक व पदाधिकाऱ्यांचा सहभाग

या कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी हुसे (संपादकत्रैमासिक तिफन), सुनील डोके (जिल्हाध्यक्ष), अशोक शेवगन (कार्याध्यक्ष), डॉ. जयश्री कुमावत (उपाध्यक्ष), विजयकुमार पांचाळ (उपाध्यक्ष), डॉ. दैवत सावंत (सचिव), माधुरी चौधरी (सहसचिव), डॉ. संजय शिंदे (संघटक), प्रा. नागेश बोंतेवाड (सहसंघटक), सुनिता कपाळे (कोषाध्यक्ष), प्रा. पंजाबराव मोरे (प्रसिद्धीप्रमुख) यांच्यासह संजय खाडे, संजय प्र. गायकवाड, उज्ज्वला कोंडके, प्रिया धारूरकर, वृपाली सोनवणे आणि गिरीश जोशी हे कार्यकारिणी सदस्य सहभागी आहेत.

साहित्य भारतीच्या वतीने प्रा. विजय पोहनेरकर (जिल्हाध्यक्ष), प्रा. डॉ. महेश खरात (कार्याध्यक्ष), प्रा. संजय संभाळकर (मंत्री), दिपाली कुलकर्णी, विनायक पवार, प्रा. डॉ. मनोहर बस बन्सवाल, शेषराव पठाडे, सारिका कुलकर्णी, मधुकर कांबळे, प्रा. तृप्ती रोंधे, डॉ. निलेश देगावकर आणि डॉ. संतोष देशमुख यांच्यासह सर्व पदाधिकारी सहभागी आहेत.

दोन्ही मान्यवरांच्या कार्याला आणि स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यासाठी साहित्यिक, कलावंत, भाषा-अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रक्षाबंधन हा सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय सुरक्षेचा उत्सव


**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर - रक्षाबंधन हा सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय सुरक्षेला गती देण्यासाठी पूरक उत्सव आहे असे मत प्रसिद्ध विचारवंत माजी कुलगुरू डॉ. वि.ल. धारूरकर यांनी व्यक्त केले ते एन २, सिडको येथील केशवप्रभात शाखेत रक्षाबंधन उत्सव प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी नगर संघ चालक श्री बबनराव जगडे हे होते.

प्रारंभी श्री उल्हास साकळगावकर देशमुख यांनी सर्वांचे स्वागत केले याप्रसंगी श्री पाटील यांनी सुभाषित सादर केले तर श्री चाटे यांनी अमृत विचार सांगितले. आपल्या भाषणात डॉक्टर पुढे म्हणाले श्री गुरुजींनी लिहिलेल्या आपले उत्सव या ग्रंथामध्ये रक्षाबंधन उत्सवाचे सांस्कृतिक मूल्य स्पष्ट करण्यात आले आहे. त्यांनी एकविसाव्या शतकात वर्तमान संदर्भात रक्षाबंधन उत्सवाचे महत्त्व सांगताना तरुणांच्या मध्ये देशभक्ती समरसता आणि सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उत्सव अत्यंत पूरक आणि प्रेरक आहे असे सांगितले. त्यांनी आपल्या भाषणात डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार तसेच श्री गोळवलकर गुरुजी, बाळासाहेब देवरास आणि प्राध्यापक राजेंद्र सिंग तसेच के. सुदर्शन आणि श्री मोहनजी भागवत यांच्या कार्याचा परामर्ष घेतला.

शताब्दी वर्षाच्या काळात संघाची वाटचाल कशी समर्थपणे चालू आहे हे स्पष्ट करून त्यांनी सिडको भागात पाच नवीन शाखा स्थापन करण्याचा मनोदय प्रकट केला. याप्रसंगी सर्वश्री पी व्ही काटे श्री आंबेकर तसेच श्री पाटील आणि श्री. रघुवीर ओक, गांधीलीचे सरपंच श्री वाघ तसेच भाजप ग्रामीणचे उपाध्यक्ष जयराज कुटे उपस्थित होते. शेवटी श्री वाघ बाबळगावकर यांनी आभार मानले.



# प्रा. डॉ. रफीउद्दीन नासेर यांच्या ५३ व्या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - प्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ, एथ्नोबॉटनिस्ट, विज्ञान प्रसारक, प्राचार्य शिवाजी महाविद्यालय पळशी, शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. रफीउद्दीन नासेर यांच्या ''इम्पॉर्टन्ट इथनोबॉटनिकेल प्लांट्स ऑफ औरंगाबाद '' या ५३ व्या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन एका दिमाखदार समारंभात करण्यात आले.

शिवाजी महाविद्यालय, पाळसी येथील सेमिनार हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात अखिल लोक कल्याण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र खंडेलवाल यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी प्राचार्य स्मिता वाणी, प्राचार्य मनीषा कात्यायनी, कुशल पाटील , प्राध्यापकवर्ग तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. नासेर यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक, संशोधनात्मक आणि लेखन क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्यांच्या ५३ पुस्तकांचे प्रकाशन हा त्यांच्या सातत्यपूर्ण ज्ञानसाधनेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिचय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सदर पुस्तकात छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण वनस्पती प्रजाती, त्यांचे पारंपरिक उपयोग तसेच एथ्नोबॉटनिकल महत्त्व यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक आणि संशोधकांसाठी हे पुस्तक उपयुक्त संदर्भग्रंथ ठरणार आहे.

# कविता: महासागरातील मोती

**ज्योतिर्मय साहित्य**

**ललित...**
**@ आनंदा वारांगणे**
**8698626369**

कविता म्हणजे काय? याच्या अनेक व्याख्या विचारवंतांनी केलेल्या आहेत. मी सुध्दा माझे मत येथे मांडत आहे. मला कविता म्हणजे महासागरातील मोती वाटते.

कविता लिहिताना अंत:करणाचे मंथन होते. तेव्हा कुठे कवितारुपी लोणी चाखायला मिळते. आयुष्यातील वेदना, सुख-दु:ख यातून ती जन्म घेते.याच कवितांची गीते होतात. ती श्रोत्यांना आनंद देतात. जगण्याची नवी उमेद देतात. मनातील भावनांचे प्रकटीकरण तिच्या माध्यमातून होते. तिचा जन्म झाला की वाहत्या नदीप्रमाणे मन निर्मळ होते. आज आपण कविता लिहिणार आहोत हे बर्याचवेळा कवीने ठरविलेले नसते.त्याला एकदम काहीतरी कल्पना सुचते व शब्दांमागून शब्द येतात व नवीन कविता तयार होते.ती लिहून झाली की विविध प्रसारमाध्यमांतून वाचकांपर्यंत पोहोचते. ते आपली प्रतिक्रिया देतात व लेखकाला समाधान लाभते.वाचकाला आनंद मिळाला की लेखकाला समाधान वाटते.

बहुधा वेदना ही काव्याची जननी आहे. अतीव दु:ख झाले की, कुणालातरी सांगावेसे वाटते.हेच दु:ख काव्यातून जन्म घेते. मन निर्मळ होते.मनावरील ताण कमी होतो.ती सृजनशीलतेला जन्म देते. जीवनातील अनुभव व्यक्त करण्याचेही ते प्रभावी माध्यम आहे. जगद्गुरू तुकोबारायांनी त्यांना आलेले अनेक अनुभव अभंगाद्वारे व्यक्त केलेले आहेत. आपल्या एका अभंगात ते म्हणतात, '' तुका म्हणे येथे पाहिजे अनुभव।शब्दांचे गौरव कामा नये।''

आपण जे काही बोलतो, करतो त्याला अनुभवांची ओल असावी. नुसते वरवरचे ते नसावे. मी शेतकर्यांचा मुलगा व शिक्षकही आहे. शेती, शेतकरी, शेतमजूर यांचे सर्व अनुभव घेतलेले आहेत. ते मी माझ्या कवितांमधून व्यक्त केलेले आहेत. सध्याच माझा वेणू हा काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आहे. त्यातील ओला दुष्काळ या कवितेतील ओळी आहेत -

व्याजाने पैसे घेऊन पेरलं वावर
अस्मानिच्या तडाख्यात डुबली भाकर

शेतकर्यांने शेती करण्यासाठी सावकाराकडून व्याजाने पैसे घेतले व शेत पेरले; परंतु पाऊस अती झाल्याने सर्व पीक पावसात डुबले व वाळून गेले.त्यामुळे त्याला काहीच उत्पन्न हाती आले नाही.त्याची पोटची भाकरी बुडाली.

तसेच मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे शिक्षक अतिरिक्त होत आहेत. हा प्रश्न मला बेचैन करीत आहे.याच माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेवून अनेक विद्यार्थी कलेक्टर, आय. पी.एस., डॉक्टर, इंजिनिअर, नामवंत लेखक-कवयित्री, उद्योगपती झालेत. गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत; म्हणून मराठी शाळा टिकल्या पाहिजेत. ही तळमळ मराठी शाळा ह्या काव्यातून व्यक्त केली आहे.

आता मिळून हेच करु
मराठी शाळा गावी टिकवू
वादळातही अजिंक्य राहू
हिरे मोती येथेच भेटे

जे न देखे रवी ते देखे कवी, असे म्हटलेलेच आहे. खूप मोठा आशय कवितेतून लवकर मांडता येतो. मराठी साहित्यात तिचे स्थान अढळ आहे. कितीही लिहिले तरी अजून लिहावेसे वाटते. सततच्या सरावाने लेखणीलाही धार येते. वाचकांच्या काळजाचा ठाव तिने घ्यायला हवा. कसदार लेखन असेलतर कुणालाही त्याचा आस्वाद घ्यावासा वाटतो.

# ''कर्तृत्वाचा दीप, सेवाभावाची ज्योत आणि असंख्य जीवनांना प्रकाश देणारे व्यक्तिमत्त्व अशोकजी नवाल सर''










**ज्योतिर्मय साहित्य**

काही माणसे स्वतःच्या कर्तृत्वाने मोठी होतात.

काही माणसे इतरांना मोठे करून मोठी होतात

आणि काही विरळ व्यक्तिमत्त्वे अशी असतात, की त्यांच्या सहवासाने, मार्गदर्शनाने आणि सेवाभावी विचारांनी अनेकांच्या जीवनाला नवी दिशा मिळते!

अशोकजी नवलसर हे याच दुर्मीळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक!

भगवती सेवा आश्रम आणि जीवन कौशल्य सेवा विकास यांसारख्या समाजाभिमुख संस्थांच्या कार्यामागे उभी असलेली त्यांची प्रेरणादायी ऊर्जा आणि भक्कम आधार हा आमच्यासाठी सदैव मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. सामाजिक कार्याची वाट कधीच सरळ नसते; प्रश्न, अडचणी आणि अनेक गतिरोधक पावलोपावली उभे ठाकतात. मात्र अशा वेळी अशोकजींचे शांत, समंजस आणि दूरदृष्टीचे मार्गदर्शन मिळाले की, अडचणींचे रूपांतर संधीमध्ये आणि प्रश्नांचे रूपांतर उपायांमध्ये होते.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक विलक्षण बाजू म्हणजे व्यावसायिक कर्तृत्व आणि सामाजिक संवेदना यांचा सुंदर संगम!

पुण्यातील ''बिझसोल इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि.'' या अग्रगण्य सल्लागार संस्थेचे संस्थापक म्हणून त्यांनी आपल्या ज्ञानाची आणि अनुभवाची स्वतंत्र ओळख निर्माण केली. अप्रत्यक्ष कर, परकीय व्यापार धोरण आणि यांसारख्या गुंतागुंतीच्या विषयांवर तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी केलेले काम म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेची, अभ्यासाची आणि व्यावसायिक प्रामाणिकतेची साक्ष आहे.


महिंद्रा, पिरामल, जैन ग्रुप यांसारख्या नामांकित उद्योगसमूहांचा अनुभव घेतल्यानंतर स्वतःची स्वतंत्र वाट निर्माण करून बिझसोलची उभारणी करणे, हा त्यांच्या धाडसी आणि दूरदृष्टीपूर्ण प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे.

परंतु अशोकजींचे खरे मोठेपण त्यांच्या कार्यालयाच्या भिंतींमध्ये दिसत नाही; ते समाजाच्या उपेक्षित कोपऱ्यांत दिसते !

चारशेहून अधिक व्याख्याने, प्रशिक्षण कार्यक्रम आणि शासनाला वेळोवेळी दिलेल्या अभ्यासपूर्ण सूचना यामधून त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग केवळ व्यावसायिक क्षेत्रापुरता मर्यादित न ठेवता व्यापक समाजहितासाठी केला.

आणि जेव्हा हेच ज्ञान सेवेच्या रूपाने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचते, तेव्हा त्याला खऱ्या अर्थाने 'लोकसेवा' म्हणता येते!

**व्यक्तीविशेष...**



**डॉ.श्याम वा.कुलकर्णी,**
**महाळूंगे,पुणे, मो. 98238 09656**

एकल विद्यालय आणि फ्रेंड्स ऑफ ट्रायबल सोसायटी यांसारख्या उपक्रमांमधून ग्रामीण व आदिवासी भागातील असंख्य मुलांच्या आयुष्यात शिक्षणाची ज्योत पेटविण्याचे पुण्यकर्म त्यांच्या हातून घडले आहे.

ज्या झोपडीत उद्याची स्वप्ने पाहण्याचीही संधी नसते,
तेथे त्यांनी ज्ञानाचा दिवा लावला!
ज्या डोळ्यांना भविष्य अंधारमय दिसत होते,
त्या डोळ्यांत उद्याची आशा जागवली!
आणि ज्यांच्या हातात संधी नव्हती,
त्या हातांना स्वावलंबनाची दिशा दिली!

म्हणूनच अशोकजी हे केवळ यशस्वी व्यावसायिक नाहीत; ते अनेकांच्या जीवनात यशाची पहाट घेऊन येणारे भाग्यविधाते आहेत!

त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मिळालेला ''महेश गौरव'' पुरस्कार (२०१५) हा त्यांच्या कार्याला मिळालेला सन्मान आहे; परंतु माझ्या दृष्टीने त्यांचा सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे त्यांच्या कार्यामुळे एखाद्या गरजूच्या जीवनात निर्माण झालेला आनंद आणि एखाद्या विद्यार्थ्याच्या डोळ्यात चमकलेली भविष्याची आशा!

आज स्वतःच्या शारीरिक अडचणींशी संघर्ष करत असतानाही समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची धडपड, कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्याची त्यांची तळमळ आणि सकारात्मक ऊर्जा देण्याची त्यांची वृत्ती मनाला स्पर्शून जाते.

स्वतःच्या वेदना मनात ठेवून दुसऱ्यांच्या जीवनात आनंदाची फुले फुलविणे, हीच तर खऱ्या अर्थाने मोठेपणाची ओळख!

अशोकजींच्या जीवनाचा संदेश अगदी साधा, पण अत्यंत प्रभावी आहे

''विश्वासाने सुरुवात करा
जबाबदारीने कार्य करा
आणि आपल्या कर्तृत्वाचा काही भाग समाजासाठी अर्पण करा!''

मग यश केवळ आपल्या पावलांशी चालत नाही,
तर आपल्या कार्याची पाऊलखुणा इतरांच्या जीवनातही उमटते!

अशा कर्तृत्ववान, ज्ञानसंपन्न, संवेदनशील आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देताना एकच प्रार्थना

श्री भगवती मातेच्या कृपाछत्रा खाली आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, मानसिक समाधान आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो. आपल्या अनुभवाचा आणि विचारांचा प्रकाश असाच अनेकांच्या जीवनाला दिशा देत राहो आणि आपल्या हातून लोककल्याणाची अशीच असंख्य दीपज्योती प्रज्वलित होत राहो! अशोकजी, आपला जीवनप्रवास म्हणजे कर्तृत्वाची गाथा आणि सेवाभावाची प्रेरणागाथा आहे.

आपल्या वाढदिवशी त्या प्रेरणेला मनःपूर्वक नमन!

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
दीर्घायुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# बहीण, भावाचं अतूट नातं पण...?

**ज्योतिर्मय साहित्य**

रक्षाबंधनाच्या सणानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा. बहीण, भावाच्या नात्याला श्रेष्ठ मानल्या जाते. हा उदाहरण भगवान श्रीकृष्ण आणि द्रोपदी यांना वाचल्यानंतर बहीण, भावाचे नाते कशाप्रकारे निभावले जातात त्या दोघात दिसून येते म्हणून सदैव त्यांच्या नात्याला वंदन केले जाते. प्रत्येक बहीण, भाऊ एकाच आईच्या उदरातून जन्मलेले असतात, सोबत मिळून, मिसळून खेळणे ,बाळगणे,मिळून खाणे, पिणे सोबत राहत असतात एवढेच नाही तर एकाच घरात राहून लहान्याचे मोठे झालेले असतात. ते, बालपण आणि घालवलेले क्षण कोणत्याही बहीण, भावाला विसरणे शक्य नसते. या रक्षाबंधनाच्या सणानिमित्त बहीण, भावाला राखी बांधण्यासाठी वेळात,वेळ काढून जात असते. तिच्या मनात एवढा आनंद असतो की, तिच्यात असलेला आनंद बघून दुःख सुद्धा क्षणभरासाठी बाजूला होऊन जातं एवढी तिला भावाची व माहेराची ओढ लागलेली असते. ती बहीण असते व तिच्यात असलेली भावा प्रती वेडी माया असते आणि असायलाच पाहिजे. जेव्हा ती माहेरी जाते तेव्हा, सारं घर, अंगण जणू प्रफुल्लित होऊन जातं कारण ती त्या घरची लेक असते. भावाला मोठ्या आनंदाने राखी बांधते, ओवाळणी करते गोड, खाऊ भरवते व त्याच्या सुखी जीवनासाठी प्रार्थना करते त्यावेळी भाऊ सुद्धा, तिचे रक्षण करण्यासाठी संकल्प करत असतो आपले कर्तव्य व माणुसकी धर्म समजून तसेच भाऊ होण्याच्या नात्याने बहिणीच्या जीवनासाठी त्याचा जीव तुटत असतो.



हे, सर्व ठीक आहे पण,खरंच भगवान श्रीकृष्ण आणि द्रोपदी सारखे बहीण, भावाचं नातं आजकाल दिसून येतात का. .? आणि जर तसेच नाते दिसत असले असते तर हिस्सा, वाटा घेण्याचे नाव कोणत्याही बहिणीच्या ओठावर शब्द आलेच नसते किंवा भाऊ सुद्धा बहीणीला विसरला नसता. सर्वच बहीण, भाऊ वाईटच असतात असेही नाही त्यातील काही बहीण, भाऊ आजही मिळून, मिसळून राहतात पण,काहींच्या बाबतीत बघायला गेले तर बदललेले भयानक चित्र बघायला मिळत असते त्यावेळी असं वाटतं की, हे बालपणीचे बहीण, भाऊ आहेत की एकमेकांचे वैरी...?

आता नुकताच वृतपत्रात एक बातमी वाचण्यात आली होती की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासाठी बहीणीला माहेरी जाऊन कागदपत्रे आणायचे होते. आणि ती, मोठ्या आनंदाने माहेरी गेली आणि विषयावर भावासोबत बोलणं झालं तेव्हा बहीण, भावातच भांडणं सुरु झाले. यात त्या बहीणीचा काय दोष...? निदान यातरी निमित्ताने ती सर्व काही विसरून माहेरी गेली आणि याप्रकारची वागणूक तिला मिळाली मग तिचं नेमकं माहेर तरी आहे कुठे..? बहीणीचे आणि भावाचे नाते अतूट असते मेल्यावर सुध्दा तुटत नाही पण,आजकाल नकारात्मक विचारसरणीमुळे प्रत्येक माणसात लोभ, मत्सर, क्रोध, मोह यांच्याशी घट्ट नाते जुळल्यामुळे बहीण, भावाचे पवित्र नाते असलेलं तुटण्याच्या मार्गावर दिसत आहेत. याला जबाबदार ती मानसिकता आहे त्यामुळेच माणूस, माणसांपासून कोसोदूर जात आहे.

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५



लहानपणी प्रत्येक बहीण, भावात झगडे, भांडण होतच असतात आणि क्षणातच मिटत असतात पण,आजकाल बघितले तर तेच भांडण कोर्ट कचेरी पर्यंत पोहोचतात त्यानेही समाधान होत नाही तर एकमेकांचे संपत्तीच्या मोहापायी जीव घेतात याला बहीण, भावाचे नाते म्हणतात का. ..? हे कोणापासूनही लपलेले नाही अशा अनेक घटना समाजात बघायला मिळत असतात.

या दिवशी म्हणजेच रक्षाबंधनाच्या दिवशी व भाऊबीजेला जेवढा आनंद भावाला असते तेवढाच आनंद बहीणीला सुद्धा असतो कारण ती बहीण स्वतंत्रच असेल असेही नाही ती सासुरवासीन सुद्धा असते आणि याच सणामुळे तिला मोठ्या कठीण परिस्थितीतून माहेरी जाण्याची संधी मिळत असते हे तिच्यासाठी सर्वात मोठी गोष्ट असते. पण, भाऊ सुद्धा बहिणीच्या जीवनात काय सुरू याकडे थोडे लक्ष देऊन जरी तिची फोनवर असो किंवा तिच्या सासरी जाऊन तिचे सुख, दुःख जाणण्यासाठी वेळ काढत असेल तर उशीरा का होईना बहीणीचाही संसार एक दिवस सुखाचा होऊ शकतो आजच्या घडिला अशा विचारसरणीचा भाऊ असणे आवश्यक आहे. बरेचदा असं होतं की, दिसतं तसं नसतं म्हणून काही विवाहीत महिला आत्महत्या करताना दिसत आहेत. म्हणून बहीण, भावाचे अतूट नाते, प्रेम कायम ठेवण्यासाठी या फक्त रक्षाबंधनाच्या सणानिमित्त किंवा भाऊबीजेच्या निमित्ताने नातं ठेवू नये तर पदोपदी एकमेकांची आठवण काढावी व सुखा, दुःखात मदत करावा. दोघेही बहीण, भावाची जबाबदारी आहे सोबतच समाजात अनेक जाती, धर्माच्या असलेल्या मुलींना तसेच महिलांना सन्मानपूर्वक आपलीच बहीम म्हणून मान द्यावा अशा वागण्याने समाजात मान तर राहीलच पण,माणुसकी धर्म कायम टिकून राहील म्हणून आजच्या दिवशी प्रत्येक बहीण, भावांनी हे, प्रेमळ व अतूट नातं निभविण्यासाठी संकल्प करावा.

# माणदेशाच्या मातीचा अस्सल लेखक : व्यंकटेश माडगूळकर

**ज्योतिर्मय साहित्य**



मराठी साहित्याच्या समृद्धीत काही लेखक असे आहेत, ज्यांनी केवळ कथा,कादंबऱ्या लिहिल्या नाहीत, तर आपल्या लेखणीतून एक संपूर्ण विश्व उभे केले. व्यंकटेश माडगूळकर हे त्यापैकीच एक.

माणदेशाची माती, तिथली माणसं, त्यांचे सुख-दुःख, संघर्ष, स्वभाव, बोलीभाषा आणि निसर्ग यांचे इतके जिवंत चित्रण त्यांनी केले की, त्यांच्या साहित्याचे वाचन म्हणजे माणदेशाच्या गाववाटांवरून प्रत्यक्ष फिरून आल्यासारखे वाटते.

व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म ६ जुलै १९२७ रोजी सांगली जिल्ह्यातील माडगूळ येथे झाला. ग्रामीण वातावरणात बालपण गेल्यामुळे गावाकडच्या जीवनाचे बारकावे त्यांनी अगदी जवळून अनुभवले. पुढे हेच अनुभव त्यांच्या साहित्याचे सामर्थ्य बनले.

त्यांच्या लेखनात कृत्रिमता नाही. मोठमोठे शब्द नाहीत, अगदी साध्या शब्दांतून ते माणसाच्या मनाचा ठाव घेत. त्यांच्या कथा वाचताना एखादा शेतकरी, गुराखी, शिकारी, गावातील म्हातारा, भटकंती करणारा माणूस किंवा एखादी साधी स्त्री आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्या व्यक्तिरेखा केवळ कथेतल्या पात्रे राहत नाहीत,त्या आपल्या परिचयाच्या वाटू लागतात,आपल्या जवळच्या वाटू लागतात.

त्यांच्या 'माणदेशी माणसे' या कथासंग्रहाने मराठी साहित्यात एक वेगळे स्थान निर्माण केले. माणदेशातील सामान्य माणसांचे जीवन त्यांनी अत्यंत आत्मीयतेने मांडले. त्यांच्या पात्रांमध्ये मोठेपणाचा आव नाही; उलट त्यांच्या साधेपणातच जीवनाचे खरे सौंदर्य दिसते.

'बनगरवाडी' ही त्यांची अत्यंत गाजलेली कादंबरी. एका दुर्गम माणदेशी गावाचे, तिथल्या लोकांचे आणि त्यांच्या जगण्याच्या संघर्षाचे चित्रण या कादंबरीतून होते. दुष्काळ, गरिबी, अशिक्षण, निसर्गाशी झुंज आणि तरीही जगण्याची असलेली जिद्द ,या सगळ्यांचे दर्शन 'बनगरवाडी'मध्ये घडते. म्हणूनच ही केवळ एका गावाची कथा न राहता ग्रामीण जीवनाचे प्रभावी दस्तऐवजीकरण ठरते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्याची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे निसर्ग. जंगल, डोंगर, पक्षी, प्राणी, पाऊस, वारा, माळरान यांच्याशी त्यांचे अतूट नाते होते. ते निसर्गाकडे केवळ सुंदर दृश्य म्हणून पाहत नसत, निसर्ग हा त्यांच्या लेखनातील एक जिवंत पात्रच बनतो. प्राणी-पक्ष्यांच्या हालचाली, त्यांचे स्वभाव आणि त्यांच्या जगण्याची धडपड त्यांनी अत्यंत बारकाईने टिपली.

विशेष.....
गिरीश वसेकर( देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००



ते उत्तम चित्रकारही होते. त्यांच्या शब्दांप्रमाणेच त्यांच्या चित्रांमध्येही निसर्ग आणि ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. साहित्य, चित्रकला आणि निसर्गनिरीक्षण या तिन्ही क्षेत्रांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

व्यंकटेश माडगूळकर हे केवळ ग्रामीण लेखक नव्हते. ते माणसांचे लेखक होते. त्यांच्या साहित्यामध्ये माणूस त्याच्या सर्व गुणदोषांसह दिसतो. त्याच्या चुका आहेत, स्वार्थ आहे, प्रेम आहे, दुःख आहे, विनोद आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जगण्याची प्रचंड धडपड आहे.

त्यांच्या लेखनाची भाषा ही त्यांच्या साहित्याची मोठी ताकद आहे. माणदेशातील बोलीचा सहज आणि नेमका वापर करून त्यांनी मराठी भाषेला एक वेगळी लय दिली. त्यांच्या कथांतील संवाद वाचताना आपण एखाद्या गावातील माणसांशी प्रत्यक्ष बोलत आहोत, असा अनुभव येतो.

त्यांच्या लेखनात उपदेश नाही ,पण जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान सहजपणे उमगते. सामान्य माणसाच्या जीवनाकडे त्यांनी करुणेने पाहिले, पण त्याच वेळी त्यातील विनोद आणि विसंगतीही टिपली. त्यामुळे त्यांचे साहित्य भावुक असूनही कधीही कृत्रिम वाटत नाही.

व्यंकटेश माडगूळकर म्हणजे माणदेशाच्या मातीचा आवाज. त्यांनी दुर्लक्षित, उपेक्षित आणि सामान्य माणसांना आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्या लेखणीमुळे माणदेश मराठी साहित्याच्या नकाशावर ठळकपणे उमटला.

आज काळ बदलला आहे. गावांचे स्वरूप बदलत आहे, माणसांचे जीवन बदलत आहे आणि ग्रामीण संस्कृतीही बदलत आहे. तरीही माडगूळकरांचे साहित्य आजही तितकेच जिवंत वाटते. कारण त्यांनी लिहिलेले प्रश्न केवळ माणदेशाचे नव्हते, ते माणसाच्या जगण्याचे प्रश्न होते. म्हणूनच व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य वाचताना आपल्याला केवळ एका लेखकाची ओळख होत नाही तर आपल्याला मातीची, माणसांची आणि निसर्गाची ओळख होते.

त्यांच्या लेखणीला अभिवादन करताना एकच म्हणावेसे वाटते

की माणदेशाची माती, तिचा सुगंध शब्दांत पकडला, सामान्य माणसाला साहित्याचा नायक बनवले, आणि मराठी साहित्याला माणसाच्या जगण्याचा अस्सल गंध दिला.

व्यंकटेश माडगूळकर म्हणूनच मराठी साहित्याच्या मनात कायम जिवंत राहतील.

त्यांचे निधन २८ ऑगस्ट २००१रोजी झाले.

आज २८ ऑगस्ट. त्यांच्या २५ व्या स्मृती दिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली

***




## मोसंबीच्या आंबिया बहारातील फळगळ

पुढे

फायटोप्थोरा (डिंक्या व फळ सड) मुळे होणाऱ्या फळगळीसाठी:
फवारणी: एलियट (Aliette) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा रिडोमिल गोल्ड (Ridomil Gold) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी.
आळवणी (Drenching): झाडाच्या खोडाजवळ पाण्याचा निचरा योग्य असल्यास एलियट किंवा रिडोमिल गोल्डची आळवणी करावी.
३. अन्नद्रव्य व संप्रेरकांचे व्यवस्थापन (Nutrient & Hormone Spray)
अन्नद्रव्यांची कमतरता किंवा हॉर्मोनल असंतुलनामुळे होणारी फळगळ रोखण्यासाठी:
संजीवकाची फवारणी (Plant Growth Regulator):
एन.ए.ए. (NAA - प्लानोफिक्स): १० पीपीएम (म्हणजेच १ मिली प्लानोफिक्स ४.५ लिटर पाण्यात) + १९:१९:१९ ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी.
(टीप: प्लानोफिक्सचे प्रमाण जास्त झाल्यास उलट फळगळ वाढू शकते, त्यामुळे डोस अचूक घ्यावा.)
सूक्ष्म अन्नद्रव्ये (Micronutrients):
झिंक सल्फेट (०.५%) + बोरॉन (०.२%) फवारणी केल्याने फळांची देठ मजबूत होतात.
४. झाडाच्या खोडाचे संरक्षण (लेप)
खोडावर जिवाणू व बुरशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खोडाला जमिनीपासून २ ते २.५ फूट उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट (Bordo Paste - १:१:१०) किंवा रोको पेस्ट लावावी.
थोडक्यात फवारणीचे वेळापत्रक (जुले ते सप्टेंबर):
कालावधीफवारणी / उपाययोजना डोस (प्रति लिटर पाणी)
जुलै (पावसाच्या उघडीपीत) ब्ल्यू कॉपर / एम-४५ + प्लानोफिक्स + स्टिकर २.५ ग्रॅम + ०.२ मिली + १ मिली
ऑगस्ट (आर्द्रता जास्त असल्यास) एलियट किंवा रिडोमिल गोल्ड + सूक्ष्म अन्नद्रव्ये २ ग्रॅम + २ ग्रॅम
सप्टेंबर (फळांचा आकार वाढताना) रोको / बाविस्टिन किंवा ॲमिस्टार टॉप + ०:५२:३४ १.५ ग्रॅम / १ मिली + ५ ग्रॅम

# संभाजीनगरच्या रेल्वे आणि पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणी साठी शहर आणि जिल्ह्यातील संघटना एकवटल्या

## शहर आणि परिसराचे बकालीकरण रोखण्यासाठी कृतीचा निर्धार, राज्यसरकार आणि प्रशासनाला पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष न करण्याचा इशारा

**ज्योतिर्मय साहित्य**

संभाजीनगर आणि परिसरामध्ये ज्या वेगाने नवीन उद्योग येत आहेत, त्या वेगाने पायाभूत नागरी आणि वाहतुक सुविधा मात्र येत नाहीयेत. येत्या दोन तीन वर्षांमध्येच सध्याच्या उपलब्ध व्यवस्थेवर प्रचंड ताण येणार आहे. असे असूनही सरकार आणि प्रशासन पुढाकार घेऊन गंभीरपणे पाऊले उचलत आहे असे दिसत नाहीये. परिणामी संभाजीनगर आणि परिसराचे बकालीकरण होण्याचा धोका असून नागरी सुरक्षा, वाहतूक, व इतर आवश्यक बाबींवर ताण येण्याची शक्यता आहे. हा धोका ओळखून, आताच सरकारला जागे करण्यासाठी आज संभाजीनगर आणि परिसरातील तब्बल १५ संघटना, सामाजिक कार्यकर्ते एकत्र येऊन दबावगट तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. संभाजीनगर व्यापारी महासंघाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीत सर्व सहभागी सदस्यांनी सरकारकडून पायाभूत सुविधांकडे होणाऱ्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. इतर मोठ्या शहरांमध्ये हजारो कोटींचे मोठे प्रकल्प मंजूर होत असतांना, संभाजीनगर मधील सध्या मूलभूत सुविधांसाठी पण सरकार आणि प्रशासन गंभीरपणे निधी देण्यात हाथ आखडता घेते या बद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. संभाजीनगर आणि परिसरातील समस्या आणि गरजांची तड लावण्यासाठी दबावगट बनवून केवळ निवेदन न देता मोठे व्यापक जनआंदोलन उभारण्याचा आज निर्धार करण्यात आला. येत्या १७ सप्टेंबर ला मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन तीन महिन्याच्या आत सर्व संघटनांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा



अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ठराव मंजूर करण्यात आला. संघटनेतर्फे मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्या या प्रमाणे.

१. संभाजीनगर-पैठण-बीड-धाराशिव तसेच, संभाजीनगर-अहिल्यानगर आणि संभाजीनगर-चाळीसगाव नवीन रेल्वे मार्गांचा लवकरात लवकर मंजूर करून काम सुरू करावे.

२. मधील भविष्यातील वाहतुकीचा ताण लक्षात घेता, संभाजीनगर उपनगरीय रेल्वे व्यवस्था सुरू करावी आणि या व्यवस्थेत शेंद्रा. बिडकीन, वाळूज, पैठण, जालना, रोटेगाव, गंगापूर एकत्र जोडावे.

३. संभाजीनगर मधील बस वाहतूक व्यवस्थेचा विस्तार करून शेंद्रा, बिडकीन तसेच वाळूज मधील न जोडलेले भाग जोडावेत. शहर बसेस ची संख्या वाढवून कमीत कमी ७०० करावी.

४. संभाजीनगर च्या सर्व बाजूंनी रिंग रोड तयार करावा.

५. संभाजीनगर साठी मेट्रो चे आताच नियोजन करून मजुरी द्यावी.

६. संभाजीनगर आणि पैठण मधील संस्थांमध्ये उद्योगपूर्क नवीन कोर्सेस सुरू करावेत जेणेकरून स्थानिक पातळीवर स्किल फ़ोर्स तयार होईल.

७. बकालीकरण रोखण्यासाठी बिडकीन येथे नगरपालिका स्थापन करावी आणि नगरोत्थान अभियान अंतर्गत विकास निधी द्यावा.

८. प्रशासनाकडून शेतकरी तसेच स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांना योग्य तो भाव मिळेल आणि भूमाफियांकडून फसवणूक होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात.

९. संभाजीनगर विकास प्राधिकरणाला अधिक अधिकार देऊन त्यांच्याकडे परिसरातील विकासकांचे नियोजन आणि कामांची जबाबदारी घ्यावी.

१०. संभाजीनगर ची पिट लाइन लवकरात लवकर पूर्ण करून महत्वाच्या शहरांसाठी गाड्या सुरू कराव्यात.

११. मनमाड ते जालना रेल्वे मार्ग मध्य रेल्वेला जोडण्यात यावा.

१२. तक्रार निवारण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी.

या मीटिंगमध्ये सी एम आय ए, मसीआ, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ,संभाजीनगर व्यापारी महासंघ, कॅट, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मराठवाडा जनता विकास परिषद, जैन संघटना, मराठवाडा विकास संघर्ष समिती,

एम सी टी सी, औरंगाबाद को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट, रेल्वे कृती समिती कन्नड, पैठण रेल्वे समिती, बिडकीन संघर्ष समिती, रेल्वे संघर्ष समिती जालना.

अनंत बोरकर ,डॉ स्वानंद सोळंके, सरदार हरीसिंग , राजेश मेहता, शिवशंकर स्वामी, ज्ञानेश्वर अप्पा खर्डे, राहुल मोगले, मिहिर सौंदळगेकर, भारत राठोड, कल्याण बरकसे, राजकुमार रोहरा, दिनेश पारिक, संचित पातूनकर, वर्धमान जैन,संजय पवार, रवी घोडकी, मिलिंद सांगवीकर, विनोद संचेती, विकी राज पाटील, फिरोज अली, शिवा भैय्या डांगरे, ॲड शिवराम सतकर, हेमंत वाघमारेआदी मंडळी उपस्थित होती.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये रक्षाबंधन सोहळा उत्साहात संपन्न

## विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून जपला बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा संदेश

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी : बहीण-भावाच्या प्रेम, आपुलकी, विश्वास आणि संरक्षणाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा पवित्र सण ज्ञानसंदिप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, सिडको एन-७, छत्रपती संभाजीनगर** येथे आज, दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने शाळेच्या परिसरात सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थिनी विविध रंगांच्या आकर्षक राख्या घेऊन शाळेत उपस्थित झाल्या होत्या. विद्यार्थ्यांमध्येही रक्षाबंधन सोहळ्याबाबत मोठी उत्सुकता पाहायला मिळाली. शाळेच्या वतीने या उपक्रमाचे सुंदर नियोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे, संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनींनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे तसेच मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांचे औक्षण करून त्यांच्या हातावर राखी बांधली. त्यानंतर त्यांना पेढे भरवून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा आनंद साजरा केला. राखी बांधताना विद्यार्थिनींनी आपल्या भावांच्या दीर्घायुष्याची व उज्ज्वल भवितव्याची मनोमन प्रार्थना केली, तर विद्यार्थ्यांनीही आपल्या बहिणींचा सन्मान, सुरक्षितता आणि सदैव साथ देण्याचा संकल्प व्यक्त केला.

**बहीण-भावाच्या नात्याचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा उपक्रम**

रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून प्रेम, विश्वास, जिव्हाळा, जबाबदारी आणि परस्पर सन्मानाचे नाते दृढ करणारा सण आहे. शालेय जीवनात अशा संस्कारक्षम उपक्रमांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरांविषयी जिव्हाळा निर्माण होतो. तसेच विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांविषयी प्रेम, आदर, सहकार्य आणि बंधुभावाची भावना वृद्धिंगत होते.

शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रक्षाबंधन सोहळ्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी प्रेमाने राख्या बांधल्या, तर विद्यार्थ्यांनीही आनंदाने हा स्नेह स्वीकारला. त्यामुळे संपूर्ण शाळेचा परिसर बहीण-भावाच्या प्रेमळ नात्याने आणि आनंदाने भारावून गेला होता.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रक्षाबंधनाचे महत्त्व समजावून सांगितले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनात चांगले संस्कार, माणुसकी, परस्पर सन्मान आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनीही विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत शाळेत विविध संस्कारक्षम व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी एकमेकांना सहकार्य करून शाळेचे तसेच समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**शिक्षकवृंदाचे विशेष योगदान**

हा रक्षाबंधन सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्यांची व्यवस्था, राखी बांधण्याची प्रक्रिया तसेच संपूर्ण कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी सुनील चौधरी, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, विजय पाटील, वैशाली बागुल, शीतल घुगे आणि रत्नमाला घोरपडे** यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल पगारे यांनी अतिशय सुरेख पद्धतीने केले. त्यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगत कार्यक्रमातील विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थ्यांना **मिठाईचे वाटप** करून करण्यात आली. रक्षाबंधनाच्या निमित्ताने शाळेत साजरा करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनात बहीण-भावाच्या नात्याची गोडी, प्रेम आणि आपुलकी निर्माण करणारा ठरला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह या संपूर्ण कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कर्वेनगर येथे सामाजिक रक्षाबंधन

## स्वयंसेवकांनी नवसह्याद्री स्वच्छता कोठी येथे साजरे केले स्वच्छता - दूतांबरोबर रक्षाबंधन



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर मधील सह्याद्री प्रभात शाखेच्या वतीने नव सह्याद्री स्वच्छता कोठी येथे सामाजिक समरसतेचा संदेश देत''सामाजिक रक्षाबंधन-अनोखा रक्षाबंधन'' उत्सव साजरा करण्यात आला.या उपक्रमांतर्गत संघ स्वयंसेवकांनी कर्वेनगर परिसरातील सर्व सफाई कामगारांना राख्या बांधल्या.परिसरातील स्वच्छतेसाठी अहोरात्र झटणाऱ्या या सेवकांचा सन्मान करणे हा या मागचा हेतू होता.यावेळी त्यांना मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले.आम्ही स्वच्छतादूतांचे ऋणी आहोत आणि समाजातील सर्व घटक एकाच कुटुंबाचा भाग आहोत हा समरसता संदेश या निमित्ताने देण्यात आला.

सामाजिक बंधुभाव,आपुलकी व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश याद्वारे दिला गेला.

विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) यांनी ''कचरावेचकांच्या स्वच्छतेविषयीच्या ते करत असलेल्या कामाबद्दल कौतुक करत त्यांनी आपल्या स्वतःच्या आरोग्याविषयी काळजी घेण्याचे आवाहन केले.नागरिकांच्या उत्तम आरोग्याचे गमक तुमच्या कष्टांमुळे व नियमित कचरा उचलण्यातआहे. रक्षाबंधन हा केवळ सण नाही,तर सामाजिक बांधिलकी आहे.जे हात परिसर स्वच्छ ठेवतात त्या हातांना राखी बांधणे हे आमचे कर्तव्य आहे'' असे प्रतिपादन यावेळी केले.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर चे संघचालक उदयन पाठक, जेष्ठ स्वयंसेवक उल्हास सावळेकर, प्रा विवेक मांडके, अरविंद करंबेळकर, महापालिकेचे मनोज साकळे, कृष्णा धनगर, मनोज मोहिते, अमर कांबळे, दत्ता दोडके, ओंकार बेनकर, दीपक भोंडे, दत्तात्रय जगताप, निखिलभिसे, गौरव अडगळे, नगरसेविका ॲड मिताली सावळेकर,वेदांत गवळेकर, सह्याद्री प्रभात शाखेचे सह शिक्षक प्रकाश देशपांडे ह्यांची मुख्य उपस्थिती होती. ह्यावेळी उदयन पाठक म्हणाले,'' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त ''पंच परिवर्तन''दारे विविध सामाजिक सेवा प्रकल्प संपूर्ण देशभर संघ राबवित असल्याचे सांगितले. ''सामाजिक रक्षाबंधन'' द्वारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजातील सर्व घटकांना जोडण्याचे कार्य देशभर करीत आहे.''

यावेळी महिला व पुरुष मिळून एकूण साठ कचरावेचक, कर्वेनगर, शैलेश मधील व्यावसायिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ''सामाजिक रक्षाबंधन'' च्या निमित्ताने राख्यांमधून कृतज्ञतेची भावना दिसल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

# श्रीयश इंजिनिअरिंग आणि एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र यांच्यात सामंजस्य करार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश टेक्निकल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि एमआयडीसी स्किल सेंटर, शेंद्रा यांच्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास व उद्योगाभिमुख प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आला. एमआयडीसी स्किल सेंटरचे व्यवस्थापन एड्यूस्पार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्यामार्फत केले जाते.




या करारावर श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी, तर एड्यूस्पार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक डॉ. जी. एम. वाघमारे यांनी संस्थेच्या वतीने स्वाक्षरी केली.

या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना उद्योगमान्य प्रशिक्षण अभ्यासक्रम, ऑन-द-जॉब ट्रेनिंग आणि प्रत्यक्ष कार्यानुभव उपलब्ध करून देणे हा आहे. या धोरणात्मक भागीदारीद्वारे विद्यार्थी पदवी पूर्ण होईपर्यंत आपल्या निवडलेल्या कौशल्य क्षेत्रात उद्योगासाठी सज्ज होतील. यामध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर तसेच इतर तांत्रिक शाखांमधील कौशल्यविकासावर विशेष भर दिला जाणार आहे.

यावेळी एड्यूस्पार्क इंटरनॅशनलचे सेंट्रल मॅनेजर श्री. वैभव दरवरे, प्लेसमेंट मॅनेजर श्री. योगेश काबरा, श्रीयश कॉलेजचे केंद्रीय प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा. अनिल पालवे, मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. हुलास तोंडे आणि सिव्हिल विभागप्रमुख डॉ. लोमेश महाजन उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे मुख्याधिकारी कोमोडोर सुरेंद्र गोचके यांनी या सामंजस्य कराराबद्दल एमआयडीसी स्किल सेंटर, शेंद्रा आणि एड्यूस्पार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांचे आभार व्यक्त केले., या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार उद्योगाभिमुख प्रशिक्षण, रोजगारक्षम कौशल्ये आणि करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरुळे ह्यांनी व्यक्त केला.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## अति विचार आयुष्य कसं थांबवतो?

आपल्या डोक्यात दिवसातून कितीतरी विचार येतात.
काय झालं असतं जर...? उद्या काय होईल?
मी घेतलेला निर्णय चुकला तर? लोक काय म्हणतील? माझ्याकडून हे जमलं नाही तर?
एखादी छोटीशी गोष्ट घडते आणि आपण तिच्याभोवती शंभर प्रश्न उभे करतो.
प्रश्न संपत नाहीत... पण मनाचा शांतपणा संपतो.
यालाच आपण म्हणतो - अति विचार.
विचार करणं चुकीचं नाही.
विचार आपल्याला निर्णय घ्यायला शिकवतात.
पण जेव्हा विचार करण्याऐवजी आपण त्याच गोष्टीचा पुन्हा पुन्हा विचार करत राहतो, तेव्हा विचार आपली ताकद बनत नाहीत...
तेच आपली कमजोरी बनतात.
अति विचार आपल्याला समस्या सोडवायला शिकवत नाही... तो आपल्याला त्या समस्येच्या भीतीत जगायला शिकवतो.
एखाद्या निर्णयाचा विचार करताना आपण अपयशाची दहा कारणं शोधतो.
आणि मग... ज्याची सुरुवातही केलेली नसते, त्याचा शेवट मनात करून टाकतो.
सगळ्यात दुःखाची गोष्ट म्हणजे—
आपण ज्या गोष्टीची भीती बाळगतो, त्यापैकी अनेक गोष्टी कधी घडतच नाहीत.
पण त्या न घडलेल्या गोष्टींचं दुःख आपण आधीच जगून घेतो. हीच अति विचारांची वेदना आहे.
काल हा धडा आहे, शिक्षा नाही.
आणि उद्या ही संधी आहे, संकट नाही.
म्हणून जेव्हा मनात विचारांचा गोंधळ सुरू होईल, तेव्हा स्वतःला एक प्रश्न विचारा—
"हा विचार मला उपाय देतोय की फक्त भीती?"
जर उपाय देत असेल तर कृती करा.
जर फक्त भीती देत असेल तर त्याला थांबायला सांगा.
लक्षात ठेवा - काल बदलता येत नाही आणि उद्या अजून आलेलं नाही. आपल्या हातात फक्त आज आहे.
मग आजचा दिवस उद्याच्या कल्पित संकटात का जाळायचा?
अति विचार कमी करण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे
जे आपल्या नियंत्रणात आहे त्यावर लक्ष द्या.
(क्रमशः)

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



## प्रेमातून धर्माकडे-श्रीकृष्णावताराचे रहस्य

भगवंताचा अवतार केवळ लीला करण्यासाठी नसतो; तो धर्मसंस्थापनेसाठी असतो.
भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण स्वतः घोषित करतात
"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥"
(गीता ४.७)
"परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे॥"
(गीता ४.८)
द्वापरयुगातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. कंस, जरासंध, शिशुपाल, नरकासुर यांसारख्या अत्याचारी राजांनी पृथ्वीला भयभीत केले होते. ऋषिमुनींचे यज्ञ विघ्नित होत होते, धर्माचा ऱ्हास होत होता आणि सत्याचा अवमान होत होता.
या काळात श्रीकृष्णांनी प्रथम प्रेम, वात्सल्य आणि भक्तीची गंगा वाहिली. वृंदावनातील बाललीला, गोपींचे प्रेम, गोवर्धनधारण, कालियामर्दन—या सर्व लीलांनी भक्तीचे सौंदर्य प्रकट केले.
परंतु भगवंताची करुणा कधीही दुर्बलता नसते.
जेव्हा अधर्म मर्यादा ओलांडतो, तेव्हा तीच करुणा धर्मरक्षणासाठी तेजस्वी रूप धारण करते.
याच तत्त्वाचे प्रतीक म्हणजे सुदर्शनचक्र.
'सुदर्शन' म्हणजे शुद्ध दृष्टी, सत्याचे दर्शन.
त्यामुळे सुदर्शनचक्र हे केवळ युद्धातील अस्त्र नसून ईश्वराच्या अचूक न्यायाचे आणि धर्मरक्षणाच्या संकल्पाचे प्रतीक आहे.
श्रीमद्भागवतामध्ये अनेक प्रसंगी भगवान श्रीकृष्ण सुदर्शनचक्राने अधर्माचा नाश करतात. शिशुपालाचा उद्धार, नरकासुरवध, बाणासुरावरील विजय—या प्रत्येक प्रसंगात सुदर्शनचक्राने केवळ दुष्टांचा विनाश केला नाही, तर धर्माची प्रतिष्ठाही केली.
भगवान परशुराम हे स्वतः विष्णूंचे आवेशावतार मानले जातात. त्यांनी अधर्मी क्षत्रियांचा दर्प मोडला; तर श्रीकृष्णांनी धर्माधिष्ठित राज्यव्यवस्थेची पुनर्स्थापना केली. दोघांचे कार्य वेगळे असले, तरी ध्येय एकच होते—धर्माचे रक्षण आणि सज्जनांचे पालन.
समर्थ रामदासस्वामी म्हणतात—
"धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यासि मारावे
।
मारिता मारिता घ्यावे । राज्य आपुले ॥"
याचा अर्थ हिंसेचे समर्थन नव्हे; तर धर्मरक्षणासाठी आवश्यक ते धैर्य, त्याग आणि कर्तव्यभाव स्वीकारणे होय.
(क्रमशः)



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## काका (कुटुंबाचा भक्कम आधारस्तंभ)

पुढे.....
त्यांच्याजवळून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. म्हणून नात्यांच्या महावस्त्रातील अतिशय महत्त्वाचा असा हा पदर आहे. माझ्या वडिलांनी देखील त्यांच्या पुतण्यांवर जीवापाड प्रेम केलं. त्यांच्या आजारपणात त्यांच्या जवळ राहून सुश्रुषा केली.
मला दोन भाऊ, दोघेही माझ्यापेक्षा लहान. त्यामुळे माझ्या मुलांना लहानपणापासून त्यांचे प्रेम लाभले. त्यामुळे काका म्हणजे त्यांची अतिशय जिव्हाळ्याची व्यक्ती. घरात कुठलेही कार्य असो, काका सगळ्या प्रसंगात खंबीरपणे उभे राहायचे.
एखादी जबाबदारी त्यांच्यावर सोपवली की मी निश्चिंत असायचो. सायकल शिकवणारे, पहिल्यांदा पोहायला घेऊन जाणारे, जत्रेत फिरवणारे किंवा छोटीशी चूकही समजावून सांगणारे काका माझ्या मुलांच्या बालपणाच्या आठवणींचं केंद्र आहेत. माझी मुलगी जेव्हा जीवावरच्या आजारातून उठली, तेव्हा या दोन्ही भावांच्या डोळ्यातील पाणी मी पाहिले आहे. तिच्या लग्नात माझ्यासारखेच पाणी या दोघांच्या डोळ्यांत तिला सासरी पाठवताना होते. अशा वेळी नात्याची खोली, उबदारपणा आणि महत्त्व जाणवते.
अनेक भारतीय कुटुंबांत काकाला वडिलांप्रमाणेच आदराचे स्थान दिले जाते. काका हे केवळ नातं नसतं, तर ती कुटुंबाची एक भक्कम ढाल असते.
(क्रमशः)

# ॥ज्योतिर्मय॥ दीपावली - 2026

## आनंदाचे डोही आनंद तरंग....

प्रकाशन
20 ऑक्टोबर 2026
विजया दशमी
च्या
मुहूर्तावर

दीपावली हिंदू मनामनातील सर्वात मोठा सण. दीपावली म्हणजे सर्वत्र आनंदी आनंद गडे, दीपावली हा असा सण आहे की लहान थोरापासून ते आजोबा आज्जी पर्यंत सर्वच आनंदाने उजळून निघतात. सर्वत्र प्रसन्न वातावरण, फराळाची रेलचेल, नवीन कपडे, नवीन खरेदी, नवीन प्रकल्प, नवीन योजना, नवे मित्र-मैत्रिणी, सुट्टीची धमाल, आणि वाचनीय दिवाळी अंक हे अनेक वर्षापासून चालत आलेलं न बदललेलं एक सुखाचं समीकरण.

बदलत्या आधुनिकीकरणाने खूप साऱ्या गोष्टी बदलत आहेत, बद्दलले आहेत पण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो सर्व भारतीय संपूर्ण जगात अतिशय उत्साहात साजरा करतात.

दिवाळी आणि दिवाळी अंक हे समीकरण शेकडो. वर्षापासून चालत आलेलं आहे आणि ते अखंड चाल्तं राहणार, कारण दिवाळी अंकाशिवाय दिवाळी अधुरी आहे.

"ज्योतिर्मय दीपावळी" या नावातच सर्व काही सामावलेलं आहे, साहित्यांनी नटलेला संपूर्ण कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी या अंकात खूप काही असणार आहे.

**त्यासाठी ज्योतिर्मय साहित्यच्या सर्व साहित्यिकांना आवाहन आहे की ज्यांनी त्यांचे दर्जेदार साहित्य 15 सप्टेंबर 2026 पर्यंत - sanjayvyapari@gmaii.com या ई-मेल आयडीवर किंवा 7743818559 या व्हाट्सअप वर पाठवावे.**

- तुमच्या साहित्यावर "ज्योतिर्मय दीपावली" करिता लेख, किंवा कविता अशा स्पष्ट उल्लेख करावा.
- प्रत्येक साहित्यिक एक आर्टिकल व एक कविता पाठवू शकतो किंवा फक्त दोन कविता पाठवू शकतो.
- साहित्यावर लेखकाचा संपूर्ण पत्ता, पिनकोडसह असणे आवश्यक आहे.

## दिवाळी अंकासाठी विषय

1. मोबाईलचा अतिरेक
   (उप विषय)
   1. मोबाईलचा लहान मुलांवर होणारा परिणाम
   2. मोबाईलचा तरुण वर्गावर होणारा परिणाम
   3. स्क्रीन टाईम किती असावा
   4. वाहनात किंवा वाहनावर मोबाईल वापरणे धोक्याचे.
   5. मोबाईलमुळे एकटेपणा वाढला.
   6. मोबाईल संदर्भात कोणताही विषय
2. भारतीय सण
   (उप विषय)
   1. भारतीय सण आणि त्यामागील भूमिका
   2. सण - माणसांना जोडणारा दुवा
   3. मंदिरे आणि व्यवसायीकरण
3. माझे आठवणीतील पर्यटन
4. A I प्रणाली - फायदे / तोटे
5. देव माणसातच आहे
6. शाळेतील आठवणी
7. आज्जी आजोबांच्या गोष्टी हरवल्या
8. संस्काराचे महत्व
9. बाल साहित्य
10. इतर कोणताही सकारात्मक विषय

**दिवाळी अंक प्रकाशनापूर्वीच पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.**

एका अंकासाठी ₹.500
व त्यापेक्षा जास्त अंकासाठी
पुढील प्रत्येक अंकासाठी + ₹300
रुपये पडतील.
दिवाळी अंकाचे पेमेंट
100 टक्के ॲडव्हान्स लागेल.

### पेमेंट पाठवण्याची माहिती

ज्योतिर्मय प्रकाशन
ऑनलाईन फोन पे नंबर
पे 7743818559
या नंबरवर पाठवावे व
पेमेंट पाठवल्याचा स्क्रीनशॉट
त्याच व्हाट्सअप नंबरवर पाठवावा.

**सर्वांना लेखनासाठी खूपखूप शुभेच्छा!**

- संपादक,
**ज्योतिर्मय दीपावली**
पुणे | छ. संभाजीनगर
मो. 7743918559, 7743818559